# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

**दिनांक ०६.१०.२०२६ मंगळवार**

**गुन्हेगारांचा आदान—प्रदान कार्यक्रम संपन्न :—**

दिनांक ०६.१०.२०२६ चे ११.०० वा., मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाने नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे येथे अटक व मा. न्यायालयाकडून पोलीस कोठडी प्राप्त असणारे तसेच, रेकॉर्डवरील असे एकूण १० अटक आरोपींचे आदान—प्रदान हे पोलीस मुख्यालय, नागपुर शहर येथील अलंकार सभागृह येथे पार पडले. आदान—प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत याबाबत माहितीचे आदान—प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उपआयुक्त (डिटेक्शन) व मा. श्री. वैभव जाधव, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा), श्री. पप्पु कादरी (पोनि. वाहनचोरी विरोधी पथक) हे उपस्थित होते. तसेच, एकूण २४ पोलीस ठाणे येथील अधिकारी व अंमलदार आणि आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील अधिकारी व अंमलदार हजर होते. दिनांक १४.०७.२०२६ पासुन आजपावेतो एकूण २१३ अटक आरोपीतांना आदान—प्रदान मोहीमेकरीता हजर करण्यात आलेले आहे.

कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली समजून घेवुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचा डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा हजर ठाणे प्रभारी व तपासी अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे तहसिल :— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी संकेत संजय खानोलकर, वय ३७ वर्षे, रा. ईतवारी मेन रोड, उमरेड यांचे उमरेड शहरात व त्यांचे भाऊ नामे प्रणव खानोरकर यांचे दिघोरी, उमरेड रोड, नागपुर येथे ‘वसंतराव विठोबासाव खानोरकर’ नावाचे ज्वेलर्स चे दुकान आहे. फिर्यादीचे भावाचे दुकानात किसन मुरलीधर रोकडे, वय ५३ वर्षे, रा. प्लॉट नं. ५०, गारगोटी, तुळजाई नगर, दिघोरी, हुडकेश्वर, नागपुर हे मागील ८—१० वर्षापासुन काम करतात. तसेच, ते दागिणे ने—आण करण्याचे काम करतात. दिनांक ०३.१०.२०२६ चे १७.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे भावाचे दुकानात काम करणारे किसन रोकडे हे उमरेड येथील ज्वेलरी शॉपमधुन ३३ ग्राम सोन्याचा गोळा, गोफ, ब्रेसलेट, कानातील असा एकुण ६९ ग्राम सोन्याच्या वस्तु घेवुन, दिघोरी येथील दुकानात आले. फिर्यादी यांनी दागिणे दुरूस्तीकरीता ईतवारी येथील एका कारागिराकडे त्यांना पाठविले. रोकडे यांनी टेलीफोन चौक दिघारी येथुन ऑटोने सक्करदरा चौक व त्यानंतर सक्करदरा चौक येथुन टांगास्टॅण्ड चौक येथे ई—रिक्षाने गेले. रस्त्यामध्ये त्यांचेसोबत अनोळखी

महीला व ईसम हे सुध्दा बसले होते व ते रस्त्यात उतरून गेलेले होते. रोकडे यांनी कारागिर जमाल यांचे दुकानात गेल्यावर त्यांचेजवळील पर्स चेक केली असता, दागिणे दिसुन आले नाहीत. कोणीतरी अज्ञात ईसमाने त्यांचे जवळील पर्समधील ६९ ग्राम सोन्याचे दागिणे एकुण किंमती ७,००,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसिल येथे पोउपनि. महेंद्र वासनिक ९९२२३१०७१४ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे कळमना** :— फिर्यादी योगेश भगवान धांडे, वय ३६ वर्षे, रा. मु.पो. नांद गायमुख, तह. सावनेर, जि. नागपुर यांनी पोलीस ठाणे कळमना येथे तक्रार दिली की, त्यांचे वडील नामे भगवान रामाजी धांडे, वय ६८ वर्ष हे दिनांक १०.०९.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे कळमना हद्दीतुन बेपत्ता झाले आहेत. शोध घेतला असता, मिळून आले नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, उंची— ५ फुट ३ इंच, बांधा—साडपातळ, केस—पांढरे व टक्कल पडलेले, अंगात— पांढरा शर्ट व निळा फुलपॅन्ट घातलेला असुन सोबत पांढरा दुपट्टा आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात. ओळख— विसरभोळे आहेत. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे कळमना येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**२) पोलीस ठाणे बेलतरोडी** :— फिर्यादी लक्ष्मण शंकर नारखेडे, वय ७२ वर्षे, रा. खापरी पुनर्वसन, सेक्टर नं. २७, प्लॉट नं. ७, नागपुर यांनी पोलीस ठाणे बेलतरोडी येथे तक्रार दिली की, त्यांचा मुलगा नामे प्रशांत लक्ष्मण नारखेडे, वय ४६ वर्ष हे दिनांक २७.०९.२०२६ चे १५.०० वा. पासुन राहते घरून सायकल दुरूस्ती करीता जातो असे सांगुन गेले. घरी परत आले नाही. शोध घेतला असता, मिळून आले नाही. बेपत्ता आहेत. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांबट, उंची— ५ फुट ६ इंच, बांधा—साडपातळ, केस—काळे, अंगात— पांढरा लायनिंगचा शर्ट व भुरकट फुलपॅन्ट घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात. ओळख— कपाळावर व मानेवर मोस आहे. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे बेलतरोडी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



भगवान



प्रशांत

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत** :—

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहिरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **१.** | मा. १६ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०१२५५/ २००९ | कलम ४५७, ३८० भा.दं. वि. | १) आदेश एस. गजभिये, वय २० वर्षे, रा. जरीपटका स्मशान घाट जवळ, नागपुर. २) आकाश मेश्राम, वय १८ वर्षे, रा. आसरे ज्वेलर्स, बुध्द विहारजवळ, वरपाखड, जरीपटका. | ०८.१०.२०२६ |
| **२** | मा. २६ वे सह दिवाणी न्यायाधिश व. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ६२२२/२० २० | कलम १३८ एन.आय. ॲक्ट. | पर्वतकुमार मोहपात्रा, रा. मॅजेस्टीक जिम समोर, दुसरा माळा, अंतरा व्हिला समोर, बेलतरोडी, नागपुर. | ०९.१०.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**